असा. क्र. १२९ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/१०

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, डिसेंबर ७, १९९४/अग्रहायण १६, शके १९१६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Bombay 400 032, dated the 7th December 1994

CONSTITUTION OF INDIA.

No. PEN. 1091/177/SER. 4.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982, namely :—

1. (1) These rules may be called the Maharashtra Civil Services (Pension) (Amendment) Rules, 1994.

(2) These rules shall come into force on the date of their publication in the *Official Gazette*.

2. In rule 62 of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 (hereinafter referred to as " the principal rules "),—

(*a*) after sub-rule (*5*), the following sub-rule shall be inserted, namely :—

" (5A) *Compulsory Retirement Pension*, which is a pension granted to a Government servant who is compulsorily retired from Government service as a penalty ; "

(*b*) in sub-rule (*6*), the words " or required to retire " shall be deleted.

3. For the sub-heading above rule 100 of the principal rules, the following sub-heading shall be substituted, namely :—

" (5A) COMPULSORY RETIREMENT PENSION "

4. For rule 100 of the principal rules, the following rule shall be substituted, namely :—

" 100. *Compulsory Retirement Pension.*—(1) A Government servant compulsorily retired from service as a penalty may be granted, by the authority competent to impose such penalty, pension or gratuity or both at the rate not less than two-third and not more than full compensation pension or gratuity or both admissible to him on the date of his compulsory retirement.

(2) Whenever in the case of a Government servant the Government passes an order (whether original, appellate or in exercise of the power of review) awarding a pension less than the full compensation pension admissible under these rules, the Maharashtra Public Service Commission shall be consulted before such order is passed.

Explanation.—In this sub-rule, the expression " Pension " includes gratuity.

(3) A pension granted under sub-rule (*1*) shall not be less than the minimum pension as fixed by Government. "

5. For rule 101 of the principal rules, the following sub-heading and rule shall be substituted, namely :—

(6) COMPASSIONATE PENSION

101. *Grant of Compassionate Pension in deserving cases by Government.*—

(1) A Government servant who is removed from service shall forfeit his pension and gratuity :

Provided that if the case is deserving of special consideration, Government may sanction a Compassionate Pension not exceeding two-thirds of pension or gratuity or both which would have been admissible to him if he had retired on compensation pension.

(2) A compassionate pension sanctioned under the proviso to sub-rule (*1*) shall not be less than the minimum pension as fixed by Government.

(3) A dismissed Government servant is not eligible for compassionate pension.".

6. Rule 102 of the principal rules shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. W. CHAUDHARI,
Under Secretary to Government.

Accountant General, Maharashtra (Accounts and Entitlement)-I, Maharashtra, Bombay (80 copies).

Accountant General (Audit)-I, Maharashtra, Bombay (80 copies).

Accountant General, Maharashtra (Accounts and Entitlement)-II, Maharashtra, Nagpur (40 copies).

The Accountant General (Audit)-II, Maharashtra, Nagpur (40 copies).

The Pay and Accounts Officer, Bombay (40 copies).

The Resident Audit Officer, Bombay (5 copies).

The Chief Auditor, Local Fund Accounts, New Bombay.

The Secretary to Governor.

The Secretary to the Chief Minister.

Private Secretaries to all Ministers.

Private Secretaries to all Ministers of State.

All Divisional Commissioners.

*The Prothonotary and Sr. Master, High Court of Judicature, Bombay.

*The Registrar, High Court of Judicature, Appellate Side, Bombay.

*The Registrar, Office of the Lok-Ayukta and Upa-Lok-Ayukta, Bombay.

*The Secretary, Maharashtra Public Service Commission, Bombay.

*The Secretary, Maharashtra Legislature Secretariat, Bombay.

The Chief Executive Officers of all Zilla Parishads.

All Departments of the Mantralaya.

All Heads of Departments and Heads of Offices under the various Departments of the Mantralaya.

All Desks in Finance Department (5 copies to Librarian).

The Select File, SER-4.

---

*By letter.

वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ डिसेंबर १९९४

भारताचे संविधान.

क्रमांक सेनिवे. १०९१/१७७/सेवा-४.—भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३०९ याच्या, परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापरकरून महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ ला आणखी सुधारणा करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. (१) या नियमांस, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) (सुधारणा) नियम, १९९४ असे म्हणावे.

(२) हे नियम **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ (यापुढे ज्यांचा "प्रधान नियम" असा उल्लेख करण्यात येईल) मधील नियम ६२ मध्ये,—

(ए) पोट-नियम (५) नंतर खालील पोट-नियम अंतर्भूत करण्यात यावा—

"(५ ए) **सक्तीच्या सेवानिवृत्तिनंतरचे निवृत्तिवेतन.**—ज्या शासकीय कर्मचाऱ्याला शिक्षा म्हणून शासकीय सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त येते, त्याला देण्यात येणारे निवृत्तिवेतन".

(बी) पोट-नियम (६) मधील "किंवा सेवानिवृत्त होण्यास भाग पाडलेला" हे शब्द वगळण्यात यावेत.

३. प्रधान नियमाच्या नियम १०० च्या वरील उपशीर्षाऐवजी, खालील उपशीर्ष घालण्यात यावे—

"(५ ए) **सक्तीच्या सेवानिवृत्तिनंतरचे निवृत्तिवेतन**".

४. प्रधान नियमांच्या नियम १०० ऐवजी खालील नियम घालण्यात यावा :—

"१००. **सक्तीच्या सेवानिवृत्तिनंतरचे निवृत्तिवेतन.**—(१) शिक्षा म्हणून सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला, अशी शिक्षा देण्यास सक्षम असलेला प्राधिकारी, त्याच्या सक्तीच्या सेवानिवृत्तिच्या तारखेस त्याला अनुज्ञेय असणाऱ्या भरपाई निवृत्तिवेतनाच्या किंवा उपदानाच्या किंवा दोन्हींच्या दोन तृतीयांशाहून कमी नाही आणि संपूर्ण भरपाई निवृत्तिवेतनाहून किंवा उपदानाहून अधिक नाही अशा दराने निवृत्तिवेतन किंवा उपदान किंवा दोन्ही मंजूर करू शकेल.

(२) ज्यावेळी शासन शासकीय कर्मचाऱ्यास या नियमाखाली अनुज्ञेय ठरणाऱ्या पूर्ण भरपाई निवृत्तिवेतनापेक्षा कमी निवृत्तिवेतन प्रदान करणारे आदेश काढील, त्या वेळी असे आदेश (मूळ, अपिलानंतरचे किंवा पुर्नविलोकनाच्या अधिकारांचा वापरकरून काढलेले) काढण्यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सल्ला घेण्यात येईल.

स्पष्टीकरण.—या पोट-नियमातील "निवृत्तिवेतन" या संज्ञेत उपदानाचा अंतर्भाव आहे.

(३) पोट-नियम (१) खाली मंजूर केलेले निवृत्तिवेतन शासनाने निश्चित केलेल्या किमान निवृत्तिवेतनापेक्षा कमी नसेल."

५. प्रधान नियमांच्या नियम १०१ ऐवजी खालील उपशीर्ष व नियम घालण्यात यावा :–

(६) "अनुकंपा निवृत्तीवेतन

१०१. **उचित प्रकरणांमध्ये अनुकंपा निवृत्तिवेतनास शासनाकडून मंजुरी.**—(१) सेवेतून काढून टाकलेला शासकीय कर्मचारी त्याचे निवृत्तिवेतन व उपदान गमावील.

मात्र, खास विचार करण्यायोग्य प्रकरण असेल तर शासन त्याला, तो जर भरपाई निवृत्तिवेतनावर निवृत्त झाला असता तर त्यास जेवढे निवृत्तिवेतन किंवा उपदान किंवा दोन्ही अनुज्ञेय ठरले असते त्याच्या दोन तृतीयांशाहून अधिक नाही इतके अनुकंपा निवृत्तिवेतन मंजूर करू शकेल.

(२) पोट-नियम (१) च्या परंतुकान्वये मंजूर केलेले अनुकंपा निवृत्तिवेतन शासनाने निश्चित केलेल्या किमान निवृत्तिवेतनापेक्षा कमी नसेल.

(३) बडतर्फ शासकीय कर्मचारी अनुकंपा निवृत्तिवेतनास पात्र नाही."

६. प्रधान नियमांचा नियम १०२ वगळण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व. वा. चौधरी,
शासनाचे अवर सचिव.

प्रति

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),

महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (४० प्रती),

महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (४० प्रती),

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती),

निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),

मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.

राज्यपालांचे सचिव,

मुख्यमंत्र्यांचे सचिव,

सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,

सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

*प्रबंधक मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.

*प्रबंधक अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

मंत्रालयातील सर्व विभाग,

मंत्रालयाच्या निरनिराळया विभागाच्याअधीन असलेल्या सर्व विभागाचे व कार्यालयांचे प्रमुख,

वित्त विभागातील सर्व कार्यासने (ग्रंथपाल ५ प्रती),

निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

---

*पत्राद्वारे.